सं.फौ.ख.क्र. २१/२०२४
सरकार वि. रत्नमाला पुनमचंद शिंगडे
नि.क्र. १८

सरकारतर्फे साक्षदार क्रमांक १ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि
नाव - प्रकाश बळीरामजी देवतळे,
वय - ५८ वर्ष, व्यवसाय – शेती व पोलीस पाटिल,
राहणार - गोधामंडी, ता. मौदा, जिल्हा - नागपूर.

**<u>सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.व्ही. रामटेके द्वारा</u>**

१. दि. २७.०९.२०२३ रोजी पोलीसांनी मला पंचनामा करीता समंस दिले होते. आता मला समंस दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित आहे. सदर समंसला **नि.क्र. १९** देण्यात येत आहे. त्यावेळेस माझया सोबत दुसरा पंच शैलेश होता.

२. आता मला घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखवला. तो माझ्या समक्ष तयार केला होता. सदर घटनास्थळ व जप्ती पंचनामावर माझी सही अनुक्रमांक २ वर आहे. त्यातील मजकूर मला माहिती आहे. सदर घटनास्थळ व जप्ती पंचनामाला **नि.क्र.२०** देण्यात येत आहे. आरोपीला मी ओळखतो.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीचे वकिल श्री ए.स रेवतकर यांच्या मार्फत.**

३. मी ३२ वर्षापासून पोलीस पाटिल म्हणून कार्यरत आहे. हे म्हणण खरे आहे कि, पोलीसांसोबत माझे दैनंदिन दिवसांमध्ये काम पडत असते. म्हणून बरेच पोलीस माझया ओळखीचे आहे. मला घटनास्थळ पंचनामा करण्यासकरीत आरोपी रत्नमाला यांच्या घरी बोलावीले होते. हे म्हणने खरे आहे कि, खटनास्थळ करत्यावेळेस मी सदर घरचे टॅक्स पावती किंवा इतर कागद बघीतला नव्हता. हे म्हणणे खरे आहे कि, सदरवेळेस मी माझया स्वत:ची अंग झळती दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही कि, मी घटनास्थळी गेलो नव्हतो व माझया समक्ष कुठलीच जप्ती झाली नव्हती. हे म्हणणे खरे आहे कि, पोलीस माझया ओळखीचे असल्यामुळे पोलीसांना मी कामानिमित्त मदत करतो. हे म्हणणे खरे नाही कि आज रोजी मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.
मौदा.
दिनांक १५.१०.२०२५

समक्ष
**स्वाक्षरी/-**
(एन.के. वानखडे)
न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी मौदा